"दुष्टांच्या दुष्कृत्यामुळे नाही तर सज्जनांच्या निष्क्रियतेमुळे समाज बिघडतो"
स्वयंसिद्धा महिला मंडळ, लातूर
SWAYAMSIDDHA MAHILA MANDAL
H.O. : Vishva sadan, Vivekanadpuram, Latur - 413512
S.H.: P 69, MIDC, Latur - 413512 (Maharashtra)
Mob. 8390906712/40, 8390906715/19/20/23/11/24
Email : smparchure24@gmail.com
hgdixit1971@gmail.com
URL : www.swayamsiddha.in

Coop. Society Regn. No. Maha/6120/Latur dated 15.02.1996 Public Trust Regn. No. F 5749(Latur) dated 02.07.1998 NITI Aayog - Darpan Regn. No. MH/2016/0101097
SSI Regn. No. MH16B0004742 dtd.01.09.2018 SBI Bank Ac : Cur.ac no.30140917716 IFSC:SBIN0006756 PAN No. : AABTS9369M

## स्वयंसिध्दा महिला मंडळ लातूरद्वारा संचलित

## कुटुंब सल्ला केंद्र, औसा ता. औसा जि. लातूर

## यशस्वी केस तपशील

सौ. विद्या यांचा विवाह दि.१४/०९/२०१५ रोजी झाला. विद्याच्या सासरी तिचे सासु, सासरे व पती, दीर, जाऊ अशी माणसे होती. विद्या ही स्वभावाने भोळी होती. परंतु काम करण्यामधे ती सतत उत्सुक असायची. तिचा पती श्री. अतुल हा (इडली, दोसा) यांच हॉटेल चालवत होता.

श्री अतुल ही विद्याला घरामध्ये सतत छोटया छोटया कारणावरुन शारिरीक व मानसिक त्रास देत असत. विद्याला तिच्या माहेरी पाठवत नसत, तसेच तुझ्या आई वडिलांची शेती माझ्या नावे कर म्हणून विद्याला त्रास देत असे. या सर्व गोष्टीचा परिणाम विद्याच्या मनावर झाल्याने विद्या खूप दु:खी झाली होती. ती एक वर्षापासून आपल्या माहेरी राहत होती. तसेच लग्न झाल्यापासून या त्रासाला ती कंटाळली होती.

तिला आता परत जायची भिती वाटत होती. त्यामुळे तिने आपल्या केंद्राला भेट दिली व या सर्व घटना तिने समुपदेशक यांना सांगितल्या.

नंतर तिने अतुलविरुध्द केस नोंदवली. दि.३/१०/२०१७ रोजी त्यांची बैठक घेण्यात आली. यामध्ये योग्य समुपदेशन त्या दोघांनाही करण्यात आलं. पण विद्याची मानसीकता फारच बिघडलेली होती. तीला परत सासरी जाण्याची अजिबात इच्छा नव्हती. त्यामुळे तिने मी नांदायला जाणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले. तिला कोर्टातून योग्य तो न्याय मिळवून देण्यात आला. आज रोजी विद्या तिच्या आयुष्यात खूप खुश आहे.